



# पारनेर दर्शन





वर्ष १ अंक २३८, शुक्रवार ७ जुन २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# ॲड. राहुल झावरे यांच्यावर प्राणघातक हल्ला

■ मा. नगराध्यक्ष विजय औटी, मा. नगरसेवक नंदू औटींकडून मारहाण ■ पारनेर बसस्थानक चौकातील घटना
■ पारनेरमध्ये तणाव । हजारो लंके समर्थक पारनेरमध्ये ■ लंके समर्थकांचा पोलीस ठाण्यासमोर ठिय्या





■ ॲड. राहुल झावरे यांच्या कारवर हल्ला करून त्यांना मारहाण करण्यात आली. ■ झावरे यांना मारहाण झाल्यानंतर घटनास्थळी मोठा जमाव जमा झाला होता. ■ पारनेर शहरातील विजय औटी यांच्या कार्यालयावर दगडफेक झाल्यानंतर तिथे मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

पारनेर : प्रतिनिधी

**नुकत्याच जाहिर झालेल्या लोकसभा निवडणूक निकालाच्या पार्श्वभुमीवर खा. नीलेश लंके यांचे खंदे समर्थक, नीलेश लंके प्रतिष्ठाणचे सचिव ॲड. राहुल बबनराव झावरे यांच्यावर गुरूवारी दुपारी सव्वाबारा वाजण्याच्या सुमारास पारनेर बसस्थानक चौकात प्राणघातक हल्ला करण्यात आला. हल्ला करणारांमध्ये मा. नगराध्यक्ष विजय सदाशिव औटी, मा. नगरसेवक नंदकुमार सदाशिव औटी व इतर सात ते आठ जणांचा समावेश होता.**

हल्ल्यानंतर ॲड. राहुल झावरे यांना पारनेर येथील ग्रामीण रूग्णालयात दाखल करण्यात आले. तिथे प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी झावरे यांना नगर येथील जिल्हा रूग्णालयात हलविण्यात आले. सध्या झावरे यांच्यावर नगर येथे औषधोपचार सुरू आहेत.

झावरे यांच्यावर हल्ला करण्यात आल्याची माहीती समजल्यानंतर संतप्त झालेल्या खा. नीलेश लंके समर्थकांनी पारनेरकडे धाव घेतली. हल्लेखोरांवर कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी करण्यासाठी लंके समर्थकांनी पोलीस ठाण्यासमोर ठिय्या दिला होता. मोठया संख्येने लंके समर्थक जमा झाल्याने पोलीस ठाण्याच्या परीसरात तणावाचे वातावरण होते.

मिळालेल्या माहितीनुसार ॲड. राहुल झावरे, रविंद्र राजदेव, लंके यांचे स्विय सहाय्यक संदीप चौधरी, राजू तराळ हे भाळवणी रस्त्याने पारनेरकडे येत असताना पारनेर बसस्थानक चौकात विजय औटी, नंदकुमार औटी व त्यांच्या सहकाऱ्यांनी ॲड. झावरे यांचे स्विफ्ट कार अडविली. ॲड. झावरे यांना गाडीबाहेर ओढून बेदम मारहाण करण्यात आली. परिसरातील नागरीकांनी त्यांना मारहाणीतून वाचविले. दरम्यान ॲड. राहुल झावरे यांच्या स्विफ्ट कारच्या सर्व काचाही फोडण्यात आल्या. हल्ला करण्यात आला त्यात लाकडी दांडके तसेच कोयत्याचा वापर करण्यात आल्याची माहीती पुढे आली आहे. दरम्यान, याप्रकरणी रूग्णालयात राहुल झावरे यांचा जबाब नोंदविण्यात आल्यानंतर संबधितांवर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.



■ खा. नीलेश लंके यांनी नगर येथील रूग्णालयात जाऊन ॲड. झावरे यांच्या तब्येतीची विचारपूस केली. किरण काळे, अभिषेक कळमकर, भगवान फुलसौंदर, संभाजी कदम हे यावेळी उपस्थित होते.

## विजय, पराजय पचविता आला पहिजे

कोणत्याही निवडणूकीत जय पराजय असतोच. विजय आणि पराजय पचवता आला पहिजे. पारनेरमध्ये घडलेली घटना दुर्देवी आहे. राहुल झावरे यांच्या गाडीवर हल्ला करण्यात येऊन त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न झाला. विखे यांचे समर्थक विजय औटी, नंदू औटी व त्यांच्या सहकाऱ्यांनी हा हल्ला केला आहे. त्यांचा गळा दाबवण्यात आला. चॉपरचे वारही करण्यात आले. मा. सरपंच नगरे व इतर सहकारी मधी पडले नसते तर वेगळी घटना घडली असती. पोलिस खाते या जिल्हयात कुणाच्या इशाऱ्यावर चालते ? पालकमंत्र्यांचा कट्टर कार्यकर्ता हल्ले करीत असेल तर त्यास संरक्षण देता कामा नये. त्याच्यावर कठोरात कठोर गुन्हे दाखल झाले पाहिजेत. पराभव पचविण्याची ताकद त्यांच्याकडे आली पाहिजे.

राजेंद्र फाळके
जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

## औटींच्या निवासस्थानाबाहेर बंदोबस्त

राहुल झावरे यांना मारहाण झाल्याचे वृत्त तालुक्यात पसरल्यानंतर मोठया संख्येने नीलेश लंके समर्थक पारनेर येथे जमा झाले. त्यांनी विजय औटी यांच्या बंद असलेल्या संपर्क कार्यालयावर दगडफेक करण्यात आली. त्यामुळे औटी यांच्या निवासस्थानाबाहेर शिघ्र कृती दलाच्या जवानांचा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. पोलीस उपअधिक्षक संपतराव भोसले हे परीस्थितीवर नियंत्रण ठेऊन आहेत.

## सुनियोजित हल्ला

राहुल झावरे यांच्यावर झालेला हल्ला सुनियोजित होता. त्यांचा गळा दाबून जीवे मारण्याचा प्रयत्न झाला. पाच ते सात मिनिटे त्यांचा श्वास पुर्णपणे रोखला गेला होता. ऑक्सिजन सपोर्टवर त्यांना नगर येथे हालविण्यात आले. नगरच्या सिव्हील हॉस्टिपलमध्ये दाखल करण्यात आल्यानंतर त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने खाजगी रूग्णालयात हालविण्यात आले आहे.

डॉ. बाळासाहेब कावरे
खा. नीलेश लंके समर्थक

## हा हल्ला नियोजित

या घटनेचा मी निषेध करतो. जय असो वा पराजय तो आनंदाने पचविता आला पाहिजे. या लोकांना पराभव मान्य नाही. त्यामुळेच अशा घटना घडतात. राहुल झावरे यांची मी भेट घेतली, त्यांच्या छातीला, मनक्याला, डोक्याला मार असून प्रकृती चिंताजनक आहे. ज्या आरोपींनी मारहाण केली त्यांची आजवरची वक्तव्ये तपासली तर त्यांची पार्श्वभुमी गुन्हेगारी स्वरूपाची असल्याचे दिसून येते. हा हल्ला नियोजित होता. त्यांनी आजवर अनेक हाणामाऱ्या केलेल्या आहेत. यासंदर्भात आमचे सहकारी पोलीस अधिक्षकांची भेट घेणार आहेत. या गोष्टीला मी राजकीय रंग देऊ इच्छित नाही. निकाल जाहिर झाल्यानंतर मी कोणत्याही पक्षाबद्दल, नेत्याबद्दल काहीही वक्तव्य केलेले नाही. झालेल्या गोष्टी विसरून जाणारा मी कार्यकर्ता आहे. मला कोणाकडे बोटही दाखवायचे नाही. असे गुंडगिरी प्रवृत्तीचे, गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक ते पारनेरमधील असो किंवा नगरमधील असो त्यांचा बिमोड झाला पाहिजे. या मारहाणीमागे काही ठोस कारण दिसत नाही. राजकीय कारणच असू शकेल.

खासदार नीलेश लंके

## गोरेगावमधील बाचाबाची कळीचा मुद्दा

गुरूवारी सकाळी मा. नगराध्यक्ष विजय औटी यांचे समर्थक प्रितेश पानमंद आणि झावरे यांच्यात बाचाबाची झाली होती. हीच बाचाबाची झावरे यांना मारहाण होण्यास कारणीभुत ठरली. झावरे व इतर सहकारी गोरेगांवमधून परतल्यानंतर पानमंद याने विजय औटी यांना फोन करून झालेल्या बाचाबाचीची माहीती दिली. त्यानंतर औटी व त्यांच्या सहकाऱ्यांनी पारनेर बसस्थानक चौकात झावरे यांचे वाहन आडवून त्यांच्यावर हल्ला केला.

## लंके समर्थकांवर लाठीचार्ज

मारहाणीनंतर विजय औटी, नंदकुमार औटी तसेच मारहाण करताना उपस्थित असलेले त्यांचे सहकारी पारनेर पोलीस ठाण्यात गेले. लंके समर्थकांनी पोलीस ठाण्याकडे कुच करीत ठिय्या दिला. मोठया संख्येने असलेल्या लंके समर्थकाना पांगविण्याठी पोलीसांनी लाठी चार्ज केला.

## विखे समर्थकांना मारहाण

पोलीस ठाण्याच्या परिसरात जमलेल्या संतप्त लंके समर्थकांकडून विखे समर्थकांना मारहाण करण्यात आली. विखे समर्थकांच्या वाहनांची तोडफोडही करण्यात आली.

## हुकूमशाही, दादागिरीला खतपाणी नको

पराभव पचविण्याची ताकद या कुटूंबाने दाखविली पाहिजे. असे भ्याड हल्ले करून पुन्हा एकदा हुकूमशाही आणि दादागीरी याला खतपाणी घालत आहात असे निदर्शनास येत आहे. कार्यकर्त्यांना आवर घालण्याचे काम नेत्यांनी करायचे असते. तसे केले नाही तर अशा घटना वारंवार घडतील त्याला पराभव झालेलेच जबाबदार असतील असा आरोप राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी केला.

## महाराष्ट्रातील कायदा व सुव्यवस्था सांगणारी घटना

नगर दक्षिण लोकसभा मतरदारसंघातील नवनिर्वाचित खासदार नीलेश लंके यांचे समर्थक ॲड. राहुल झावरे यांच्यावर पारनेर येथे प्राणघातक हल्ला करण्यात आला. महाराष्ट्रातील कायदा आणि सुव्यवस्थेची स्थिती कशी आहे हे सांगणारी ही घटना आहे. गृहखात्याने या घटनेची तातडीने दखल घ्यावी. या प्रकरणाची सखोल चौकशी करून महाराष्ट्राचा राजकीय व सामाजिक सलोख्याचे गुन्हेगारीकरण करणाऱ्या या प्रवृत्तींना कठोर शासन करण्यासाठी प्रयत्न करावेत. आम्ही सर्वजण या घटनेचा कठोर शब्दात निषेध करीत आहोत. याप्रसंगी आम्ही सर्वजण ॲड. झावरे यांच्यासोबत ठामपणे उभे आहोत.

खा. सुप्रिया सुळे






# युवा

## ...म्हणून जुन्या काळी टिकायचे जास्त काळ !



**आज आपल्या कुटुंबात २-४ लोक आहेत, पण तेदेखील आपण सांभाळू शकत नाहीत. अशा स्थितीत घरातील कामासाठी मोलकरीण, मुलांची काळजी घेण्यासाठी बेबी सिटर आणि घरातील उर्वरित कामे करण्यासाठी नोकर ठेवत आहोत. इतकं होऊनही घरात समस्या आणि कलह सुरूच असतो. शिवाय, आजकाल नाती लवकर संपवण्याचे प्रमाणही वाढले आहे. पण जर तुम्ही विचार केलात तर लक्षात येईल की जिथे आपण अशी छोटी कुटुंबे पाहत नाहीत, तिथे पूर्वीच्या काळात २० ते २५ किंवा त्याहूनही जास्त लोक एकत्र प्रेमाने आणि कोणतीही अडचण न ठेवता कसे जगायचे ? अशा मोठ्या बदलांची कारणे आम्ही तुम्हाला सांगत आहोत...**

- संयुक्त कुटुंब फायदेशीर होते : आज बहुतेक मुले-मुली लग्नानंतर कुटुंबापासून वेगळे राहू लागले आहेत. याचे एक कारण गोपनीयता, नोकरी किंवा इतर जबाबदाऱ्या टाळणे हे असू शकते, परंतु पूर्वी असे नव्हते. कुटुंबात कितीही मुलगे किंवा सून आली तरी घरापासून विभक्त होण्याबद्दल कोणी बोलायचे नाही. याचे मुख्य कारण म्हणजे जेव्हा आपण मोठ्या कुटुंबात राहतो तेव्हा जबाबदाऱ्या आपोआप विभागल्या जातात आणि कुठेतरी जायचे असेल तर मुलांना काका-काकू, आजी-आजोबा किंवा काका-काका यांच्याकडे बिनधास्त ठेवता येत होते.
- वडिलधाऱ्यांचे न ऐकणे : पूर्वीच्या काळी कुटुंबात इतके सदस्य होते की, लग्न झालेल्या जोडप्यात घरात भांडण झाले किंवा भाऊ आपापसात भांडले तर घरातील वडीलधारी मंडळी आपसात भांडण करून मतभेद मिटवत असत. पण आज परिस्थिती अशी झाली आहे की मुले एकटे राहण्यासाठी कुटुंबापासून विभक्त होतात. त्यानंतर कुटुंबातील मोठ्यांना काही समजावून सांगायचे असले तरी त्याकडे दुर्लक्ष केले जाते. आपल्या वडिलांचे न ऐकणे हे देखील आजकाल खराब संबंधांचे एक कारण आहे.
- घटस्फोट सामान्य बाब झालाय : जर तुम्ही तुमच्या आई-वडिलांकडून किंवा काकूंकडून त्यांच्या काळाबद्दल ऐकले असेल, तर हा उल्लेख कधीतरी आलाच असेल, त्यांच्या काळात घटस्फोट असे काही नव्हते. एकदा लग्न झाले की ते पूर्ण व्हायचे . पती-पत्नीमध्ये कितीही भांडण झाले तरी एकमेकांना घटस्फोट दिला जात नव्हता. पण आज परिस्थिती अशी झाली आहे की, एखादे छोटीसे भांडण झाले की वादाची ठिणगी पेटते आणि मग प्रकरण संपुष्टात येण्यापर्यंत येते. कौटुंबिक हिंसाचार, मानसिक छळ आणि बळजबरी प्रकरणी आवाज उठवणे आणि घटस्फोट देणे योग्य आहे, परंतु निराधार कारणांसाठी नाते संपवणे चुकीचे आहे.
- संयम आणि प्रेम : आज हवं ते खाऊ न देणे, सहलीला न नेणे किंवा खरेदीसाठी न नेणे अशा छोट्या छोट्या गोष्टींवरून भांडणे सुरू होतात. पूर्वीच्या काळी असे होत नव्हते. स्त्री आणि पुरुष दोघांमध्येही संयम आणि प्रेम होते. पूर्वी लोक कोणत्याही छोट्या छोट्या गोष्टीवर रागावून बसत नसत. उलट अशा गोष्टी विसरून नातं घट्ट करण्याचा प्रयत्न करत असत. पण आजच्या लोकांमध्ये संयमाचा फारच अभाव आहे.
- कमी आनंदी रहा : माझ्याकडे मोठे घर असावे, गाडी असावी, मुलांनी खासगी शाळेत शिकावे आणि आपण देश-विदेशात फिरावे, अशी प्रत्येकाची इच्छा असते. अशा भरमसाठ इच्छा तेव्हाच पूर्ण होऊ शकतात जेव्हा उत्पन्न जास्त असेल किंवा जास्त बचत असेल. यात शो ऑफचाही एक भाग आहे. पूर्वी असं नव्हतं, त्या काळी लोकं आपल्याकडे जे आहे किंवा जे काही मिळालं आहे त्यात आनंदी असायचे आणि मनमोकळेपणाने प्रेम द्यायचे.



## तिशी गाठल्यावर स्वतःला काय विचाराल?



**एका विशिष्ट वयानंतर, आपण सर्वजण अशा परिस्थितीत पोहोचतो जिथे मागे वळून पाहणे सोपे नाही. तिशीत पोहोचल्यावर याची जाणीव प्रकर्षाने होते. म्हणूनच ३० वर्षांचे होण्याआधी, वेळेत स्वतःला काही प्रश्न विचारा. कारण या काळात आपण आपल्या जीवनातील अनेक ध्येये, मूल्ये आणि यशांचे मूल्यांकन करतो. जेणेकरून आपण कोणत्या टप्प्यावर आहोत हे आपल्याला कळू शकेल. म्हणून, हे ६ प्रश्न स्वतःला विचारा आणि शक्य असल्यास त्यांची उत्तरे डायरीत लिहा...**

### कुटुंबासाठी काय करत आहे ?

आपल्या सर्वांच्या जीवनातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपले कुटुंब, ज्यासाठी आपण काम करत आहोत आणि कमवत आहोत. पण तुम्ही जे करत आहात ते पुरेसे आहे का ? सहवास, पैसा आणि अन्न या आपल्या सामान्य गरजा आहेत, परंतु कुटुंब वेळ, प्रेम आणि सहवासाची मागणी करतात. स्वतःला विचारा, मी माझ्या कुटुंबासाठी काय करत आहे ? मी त्यांना वेळ देऊ शकतो का ? इत्यादी. जेव्हा तुम्हाला उत्तर मिळेल तेव्हा निश्चितपणे त्याचे मूल्यमापन करा.

- मी किती शिकलो ? : दिवसभर, आठवडाभर किंवा महिनाभर आपण काहीतरी नवीन शिकतो आणि काहीतरी विसरतो. अशा परिस्थितीत गेल्या काही वर्षांत तुम्ही नवीन काय शिकलात ? तुम्ही जे शिकलात ते तुम्ही किती अंमलात आणले किंवा कोणाला काही नवीन शिकवले हे प्रश्न स्वतःला विचारा आणि उत्तरे डायरीत लिहा. एक-दोन वर्षांनी जेव्हा तुम्ही ते वाचाल तेव्हा तुमच्या लक्षात येईल की तुम्ही किती शिकलात आणि असे काय होते जे तुम्हाला शिकायचे होते पण शिकता आले नाही.
- काय साध्य झाले किंवा करायचे बाकी आहे ? : दुसरा प्रश्न स्वतःला विचारायचा आहे की, तुम्ही आतापर्यंत काय साध्य केले आहे ? तुम्हाला जे वाटले होते ते तुम्ही साध्य केले का किंवा ज्या गोष्टी तुम्ही कधीच शक्य नव्हत्या तरीही त्या साध्य केल्या ? सर्व लक्ष्य साध्य झाले की नाही आदी... ३० व्या वर्षाच्या टप्प्यावर असतो तेव्हा आपण बऱ्यापैकी नोकरीत सेटल झालेलो असतो आणि अशावेळी लग्नाचीही घाई करतो. काहींचे योग्य वयातच लग्न झालेले असते.
- पुढील ५ वर्षात माझे भविष्य ? : ३० वर्षांचे वय हा मध्यम टप्पा आहे, ज्यामध्ये आपण प्रौढ नाही. अशा परिस्थितीत आपल्या भविष्याचा विचार करा, भविष्यात काय होईल ? आम्ही कुठे असू ? तुम्ही आणखी काय करत असाल ? ते आपल्या हातात नाही, पण ते कुठल्यातरी दिशेने नेणे आपल्या हातात नक्कीच आहे. म्हणूनच, पुढील ५ वर्षांमध्ये तुम्हाला स्वतःला कुठे आणि कोणत्या टप्प्यावर पहायचे आहे हे शोधण्यासाठी आताच कठोर परिश्रम सुरू करा.



### मी आनंदी आहे का ?

या एका प्रश्नाचे उत्तर तुम्हाला आयुष्यात कुठे उभे आहे हे समजण्यास मदत करेल. पण हेदेखील लक्षात ठेवणे आवश्यक आहे की जीवन हा एक प्रवास आहे. त्याच्या मार्गात तुम्हाला अनेक चढउतारांना सामोरे जावे लागेल. जर तुम्ही तुमच्या ध्येयांवर लक्ष केंद्रित केले आणि कठोर परिश्रम केले तर तुम्हाला यश नक्कीच मिळेल आणि यश आणि आनंद तुमच्या पायांचे चुंबन घेईल.

- पुढे जाण्यापासून काय रोखत आहे ? : जेव्हा आपण आयुष्यात पुढे जात असतो तेव्हा प्रत्येक कंपनी किंवा प्रत्येक संस्था आपल्याला पुढे घेऊन जाईलच हे आवश्यक नसते. काही वेळा अशा काही गोष्टी असतात ज्या आपल्याला पुढे जाण्यापासून थांबवतात आणि आपली वाढ खुंटतात. अशा परिस्थितीत, ज्या गोष्टी तुम्हाला पुढे जाण्यापासून रोखत आहेत त्यांचा विचार करणे आणि त्या सोडण्याचा किंवा त्या सुधारण्याचा प्रयत्न करणे महत्वाचे आहे.



## जोडीदाराकडून या गोष्टी मागाव्या लागत असतील तर नातं आजच संपवा!

**आजच्या काळात कोणतंही नातं टिकवण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतात. नाहीतर ते नातं कधी कमकुवत व्हायला लागतं आणि कधी संपण्याच्या मार्गावर येऊन ठेपतं हेही कळत नाही. तथापि, आपण आपले नाते जपण्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न केले पाहिजेत. परंतु जर तुमचे नाते अशा टप्प्यावर पोहोचले असेल की तुम्हाला वेळ आणि आदर यासारख्या छोट्या गोष्टींची मागणी करावी लागत असेल तर तुम्ही नाते संपवण्यासाठी पावले उचलली पाहिजेत...**

- वेळ मागावा लागतोय ? : अनेकदा असे दिसून येते की कोणत्याही नात्याच्या सुरुवातीला लोक आपल्या जोडीदारावर खूप प्रेम करतात आणि आपला सर्व वेळ देतात. घरात असो की बाहेर एकमेकांसाठी वेळ काढल्याने नाती मजबूत होतात आणि सुधारतात. पण जर तुम्हाला तुमच्या जोडीदाराकडून स्वतःसाठी वारंवार वेळ मागावा लागत असेल, तर तुमची किंमत समजून घ्या आणि नाते संपवा.
- लक्ष देत नाही ? : जर तुमचा जोडीदार तुमच्याकडे लक्ष देत नसेल तर त्याने लक्ष द्यावे म्हणून तुम्हाला प्रयत्न करावे लागत असतील तर तुमच्या नात्यातील कमकुवतपणा दर्शवते. हे वारंवार घडत असेल तर धोक्याची घंटा आहे. स्वतःचे आणि वेळेचे महत्त्व समजून एकदा जोडीदाराशी बोला. जर तो अजूनही समजत नसेल तर संबंध संपवणे योग्य आहे.
- सन्मान मागावा लागतो ? : कोणत्याही नात्याचा पाया हा परस्पर आदर असतो आणि जर तुम्हाला तुमच्या जोडीदाराला तुमचा आदर करायला सांगावे लागत असेल तर आजच्या शब्दात सांगायचे तर तो मोठा लाल झेंडा आहे. अशा रिलेशनशिपमध्ये राहू नका. ज्यामध्ये तुम्हाला तुमच्या पार्टनरला तुमचा आदर करण्यास सांगावे लागेल.
- वचनबद्धता नसणे : दोन्ही बाजूंनी दृढ वचनबद्धता गरजेची असते. ती पूर्ण होते तेव्हाच कोणतेही नाते पुढे जाते. परंतु जर तुमचा सोबती दृढ वचनबद्धतेपासून मागे राहत असेल किंवा असे करण्यास घाबरत असेल, तर तिला तिच्या भावनांबद्दल खात्री नाही. म्हणून अशा व्यक्तीशी संबंध ठेवू नका.
- एकनिष्ठ राहण्यासाठी विचारावे : जेव्हा तुम्ही नातेसंबंधात असता तेव्हा तुमच्या जोडीदाराशी एकनिष्ठ राहणे सर्वात महत्त्वाचे



असते. कुणालाही असाच जोडीदार हवा असतो. त्यामुळे प्रामाणिक राहा. पण तुमच्या विश्वासाला महत्त्व नसलेल्या किंवा तुमच्याशी एकनिष्ठ नसलेल्या नात्यात असण्याची भीती बाळगू नका. जर तुम्हाला तुमच्या जोडीदाराला एकनिष्ठ राहण्यास सांगावे लागत असेल तर हे नाते पुढे नेणे योग्य नाही.

## जोडीदाराशी जवळीक वाढवणारे ५ प्रश्न!

**तुमचे प्रेमाचं किंवा लग्नाचं नातं घट्ट होण्यासाठी तुम्ही काय करता ? जर तुमचे उत्तर काहीच नाही, फक्त एकत्र राहता, फिरता असं असेल तर तुम्ही दोघे एकमेकांच्या तितके जवळ नसाल जितके तुम्ही असायला पाहिजेत. तुमच्या जोडीदाराशी जवळीक आणि तुमच्या नात्यात ताकद तेव्हा येते जेव्हा तुम्ही तुमच्या जोडीदारासोबत काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न करता. तुमच्या जोडीदाराला चांगले ओळखण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे समोरासमोर संवाद आणि प्रश्न विचारणे. तुमच्या जोडीदाराला काय विचारायचे या संभ्रमात असाल तर तुम्ही आम्ही दिलेले ५ प्रश्न करून पाहा. हे ५ प्रश्न तुम्हाला तुमच्या जोडीदाराला जाणून घेण्यास मदत करतील आणि तुम्हाला एकमेकांच्या जवळ आणतील...**



- पहिला प्रश्न : तुमच्या जोडीदाराशी बोलत असताना तिला विचारा की, अशी कोणती गोष्ट होती जी तुला अजूनही त्रास देत आहे ? तुमचा हा प्रश्न तुम्हाला तुमच्या जोडीदाराच्या वेदनांची कल्पना तर देईलच पण तुमच्या शब्दांचा योग्य वापर करण्यासही मदत करेल. याशिवाय मनातील बोलण्याने तुमच्या जोडीदाराचे मनही हलके होईल.
- दुसरा प्रश्न : आणखी एक प्रश्न तुम्ही तुमच्या जोडीदाराला विचारू शकता, तुझ्याबद्दल अशी कोणती गोष्ट आहे जी मला समजत नाही किंवा समजणे कठीण आहे ? प्रत्येक नात्याला चांगले स्थान देण्यासाठी हा प्रश्न विचारणे खूप महत्त्वाचे आहे. कधीकधी परिस्थिती अशी बनते की आपण आपल्या जोडीदाराबद्दल गैरसमज करून घेतो किंवा तिच्या बोलण्याकडे अनावश्यक समजून दुर्लक्ष करतो. अशा परिस्थितीत, तिला हा प्रश्न विचारा आणि गोष्टी स्पष्ट करा.
- तिसरा प्रश्न : हा एक प्रश्न आहे जो तुमच्या नात्याला योग्य मार्गावर नेऊ शकतो. तुमच्या जोडीदाराला हा प्रश्न विचारा, आपल्या नात्यात तुला सर्वात जास्त कशाची भीती वाटते ? जेव्हा तुम्ही तुमच्या जोडीदाराला हा विचारता तेव्हा तिचे लक्षपूर्वक ऐका, ते तुम्हाला तुमचे नाते जतन करण्यासाठी भविष्यात आवश्यक पाऊल उचलण्यास मदत करेल.
- चौथा प्रश्न : प्रत्येक मुलगा किंवा मुलीला आपल्या जोडीदाराकडून ऐकावेसे वाटणारे वाक्य म्हणजे माझ्यात इतरांपेक्षा वेगळे काय आहे ? वचनबद्ध होण्यापूर्वी, आपण अनेकांना डेट करतो किंवा चाचणी करतो पण फक्त एकाच व्यक्तीसोबत नातं पुढे जाते. कारण आपल्या जीवनसाथीमध्ये आपल्याला हवे असलेले सर्व गुण आपल्याला तिच्यामध्ये दिसतात. विशेषतः जेव्हा तुम्ही जोडीदाराला हा प्रश्न कराल तेव्हा तिला मनापासून आनंद होतो की तुम्ही तिची स्तुती करत आहात.
- पाचवा प्रश्न : तुम्ही तुमच्या जोडीदाराला दर सहा महिन्यांनी किंवा वर्षातून एक प्रश्न विचारला पाहिजे, जर तू आपल्या नात्यातील एक गोष्ट बदलू इच्छित आहे तर ती काय असेल ? हा एक असा प्रश्न आहे जो तुमचं नातं मजबूत करेलच, पण तुमच्या चुका सुधारण्याची संधीही देईल. त्यामुळे या प्रश्नांची उत्तरे आज किंवा या आठवड्यात तुमच्या जोडीदारालाही विचारायला हवीत आणि एकमेकांची जवळीक वाढवावी.

## शॉर्ट न्यूज

### जिरवाजिरवीच्या राजकारणामुळे पराभव

**नगर :** लोकसभा मतदारसंघात अटीतटीच्या लढतीमध्ये महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांनी अखेर बाजी मारली आहे. तर शिर्डी लोकसभा मतदारसंघात उद्धवसेनेचे भाऊसाहेब वाकचौरे यांना अकोले व संगमनेर तालुक्याने तारल्याने ते विजयी झाले. खा. सदाशीव लोखंडे यांनी आपल्या पराभवाबाबत सांगताना असे म्हटले की, उत्तरेतील महायुतीच्या राजकीय नेत्यांमधील जिरवाजिरवीचे राजकारण नडले असून त्यामुळेच माझा पराभव झालाय. काळेंना कोल्हेंची आणि विखे-कोल्हेंना एकमेकांची जिरवयाची असल्याने माझीही जिरली व विखेंचीही जिरली असा आरोप केलाय.

### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**श्रीरामपूर :** कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अशोक पॉलिटेक्निक, अशोक कॉलेज ऑफ फार्मसी, भास्करराव गलांडे पाटिल आयटीआय, अशोक इंग्लिश मेडियम स्कूल, अशोक आयडियल स्कूल या शैक्षणिक संकुलामधील परीक्षेमध्ये विशेष नैपुण्य संपन्न केलेल्या विद्यार्थी व पालकांचा कौतुक सोहळा नुकताच पार पडला. यावेळी अध्यक्षस्थानी माजी आमदार भानुदास मुरकुटे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून छत्रपती संभाजीनगरच्या कृषी सहाय्यक संचालक सौ. मनीषा कार्ले, जामगावचे सरपंच आप्पासाहेब माने, जामगाव सोसायटीचे चेअरमन अशोक माने उपस्थित होते.

### आढळातून प्लास्टिक कचरा केला गोळा

**अकोले :** तालुक्यातील गणोरे येथील आढळा नदीच्या पात्रातून सामाजिक कार्यकर्त्यांनी प्लास्टिकचा कचरा गोळा करून व्यवस्थापन केले. आढळा नदी संवाद यात्रेच्या माध्यमातून हा उपक्रम आढळा परिसरात सुरू असल्याचे समन्वयक प्रा. विठ्ठल शेवाळे यांनी सांगितले. माजी विद्यार्थी स्काऊट सेवाभावी संस्था, गणोरे ग्रामपंचायत, गावातील सेवाभावी कार्यकर्ते, तसेच पर्यावरणप्रेमी सहभागी झाले होते. महाराष्ट्र शासनाने जलबिरादरी या पाण्यावर काम करणाऱ्या संस्थेच्या सहकार्याने चला जाणूया नदीला हा उपक्रम सुरू केलेला आहे.

### जागोजागी झाडे लावा चार दिला संदेश

**पारनेर :** श्री समर्थ अकॅडमी संचलित श्री समर्थ पॉलीटेक्निक म्हसणे येथे जागोजागी झाडे लावा, असा संदेश हा उपक्रम करून देण्यात आला. यावेळी वनविभाग पारनेर यांच्याकडून महाविद्यालयामध्ये वन महोत्सव अंतर्गत वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमासाठी वनपरिक्षेत्र अधिकारी एस व्ही गोरे, वनपाल पी व्ही सोनवणे, गणेश जाधव, साबळे व इतर वन विभाग कर्मचारी उपस्थित होते. महाविद्यालयाच्या प्रांगणात असलेल्या मोकळ्या जागेत वृक्षारोपण करून लावलेले प्रत्येक झाड जगवण्याचा प्रयत्न करण्याचा संकल्प उपस्थित सर्व महाविद्यालय कर्मचाऱ्यांनी केला.

### विवाहित तरुणीचा शारीरिक व मानसिक छळ

**राहुरी :** जयश्री नवनाथ धनवडे, रा. अकोळनेर, अहमदनगर. यांचे लग्न २००४ मध्ये नवनाथ बुधाजी धनवटे, रा. जोगेश्वरी आखाडा, ता. राहुरी. यांच्याशी झाले होते. लग्न झाल्यानंतर सासरच्या लोकांनी जयश्री धनवडे यांना सहा ते सात महिने चांगले नांदवले. त्यानंतर टॅम्पो घेण्यासाठी जयश्री धनवडे यांनी माहेरहून पैसे आणावेत म्हणून छळ करु लागले. तसेच शिवीगाळ करत लाथा बूक्क्यांनी मारहाण करून घराच्या बाहेर हाकलून दिले. आरोपी नवनाथ बुधाजी धनवटे, अनिल धनवटे, लक्ष्मीबाई धनवटे, रा. जोगेश्वरी आखाडा, राहुरी, यांच्यावर गुन्हा दाखल केला.

# राष्ट्रवादीचा १० जूनला नगरमध्ये वर्धापन दिन

## शरद पवारांची उपस्थिती

**नगर : प्रतिनिधी**

**देशात लोकसभेच्या निवडणुका झाल्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने पक्षाचा वर्धापन दिन येथे १० जून रोजी नगर येथे करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यभरातून पदाधिकारी व कार्यकर्ते या ठिकाणी मोठ्या संख्येने येणार आहे, अशी माहिती जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी दिली. पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे.**



१० जून रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा वर्धापन दिन असतो. तो वर्धापन दिन यंदा एकत्रितपणे साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वर्धापन दिनचा कार्यक्रम नगर येथे होणार आहे. या कार्यक्रमासाठी निवडून आलेले सर्व खासदार या ठिकाणी उपस्थित राहणार असल्याचे जिल्हाध्यक्ष फाळके यांनी सांगितले.

राष्ट्रवादीचा गौप्यस्फोट, पालकमंत्र्यांच्या राजीनाम्याची अप्रत्यक्ष मागणी

# विखेंच्या त्रासाला कंटाळूनच भाजप नेत्यांची लंकेंना मदत

**नगर : प्रतिनिधी**

**अनेक भाजप नेत्यांनी विखे यांच्या त्रासाला कंटाळून लंके यांना मदत केल्याचा गौप्यस्फोट राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी पत्रकार परिषदेत केला. पक्षशिस्त महत्वाची मानून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुसरी जबाबदारी देण्याची मागणी पक्षाकडे केली आहे, तर पालकमंत्र्यांनीही अशी पक्षशिस्त व नैतिकता दाखवावी, असा सल्ला देत अप्रत्यक्षपणे त्यांच्या राजीनाम्याची मागणी फाळके यांनी या वेळी केली.**



लोकसभा निवडणुकीतील विजयानंतर महाविकास आघाडीने पत्रकार परिषद घेतली. यावेळी काँग्रेस, शिवसेना, राष्ट्रवादी, आप यांच्यासह सहयोगी पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. जिल्हाध्यक्ष फाळके म्हणाले, सामान्यांना त्रास देण्याचे काम पालकमंत्र्यांकडून झाले आहे. आम्ही अतिक्रमणांच्या विरोधातच आहोत. मात्र, सुप्यासारखी अतिक्रमणे जिल्हाभरात आहेत व ती दिसत नाही. सुपे येथे सूड बुद्धीने कारवाई झाली. सामान्यांना त्रास दिल्यावर उद्रेक होतो, हे सामान्यांनी दाखवून दिले.

**पिपाणीची ४० हजार मते नीलेश लंके यांचीच तुतारीशी साधर्म्य असलेले पिपाणी चिन्ह मिळालेल्या उमेदवाराला ४४ हजार ५०० मते मिळाली. १७ पेक्षा जास्त उमेदवार असल्याने दोन ईव्हीएम मशीन होते पहिल्या ईव्हीएमच्या दुसऱ्या क्रमांकावर लंके यांचे नाव होते. तर दुसऱ्या ईव्हीएमच्या दुसऱ्या क्रमांकावर तुतारी साधर्म्य असलेले चिन्ह असलेल्या उमेदवाराचे नाव होते. त्याला कोणीही ओळखत नाही. त्यामुळे त्याला मिळालेल्या मतांपैकी किमान ४० हजार मते लंके यांचीच आहेत, असा दावाही फाळके यांनी केला.**

# आता राज्यात मविआचा मुख्यमंत्री होणार !

## आ.बाळासाहेब थोरात यांचा विश्वास

**संगमनेर : प्रतिनिधी**

**संगमनेर लोकसभेच्या निवडणुकीनंतर आता विधानसभेच्या निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीचाच मुख्यमंत्री होईल, असा विश्वास माजी महसूलमंत्री काँग्रेस नेते आमदार बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केला.**

राज्यात महाविकास आघाडीच्या यशाबद्दल पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, राज्यात ज्या पद्धतीने एकनाथ शिंदे यांचे सरकार सत्तेवर आले आणि चुकीचे पायंडे पाडले, हे जनतेला आवडले नाही. देश पातळीवर ज्या पद्धतीने राजकारण चालू आहे, त्याच्याविरुद्ध जनतेने आपले मत नोंदविले. महाविकास आघाडीच्या पाठीमागे जनता भक्कमपणे उभी राहिली.



शिर्डीतील विजयाबद्दल बोलताना ते म्हणाले, भाऊसाहेब वाकचौरे सतत जनतेमध्ये राहणारे कार्यकर्ते होते. खासदार नसतानाही ते लोकांमध्ये राहिले. महाविकास आघाडीच्या सर्व कार्यकर्त्यांनी त्यांचा नियोजनबद्ध प्रचार केला. अहमदनगरमध्ये लंके यांच्या विजयाबद्दल थोरात म्हणाले, कोरोनाच्या काळात त्यांनी चांगले काम केले होते. सुजय विखे तरूण खासदार होते. त्यांच्याकडून काही चुकलं असेल, तर तेही आपण समजू शकतो. मात्र राधाकृष्ण विखे पाटील मंत्री झाल्यानंतर त्यांचं वागणं दहशतीचं होतं. लोकांना त्रासदायक होतं. प्रशासनाचा गैरवापर ते करत होते आणि त्यातूनच पारनेर तालुक्यात जो त्रास होत होता. त्यातून लंके यांचे नेतृत्व पुढे आले. आणि त्यामुळे विखेंना पराभवाला सामोरे जावे लागले, असे आमदार बाळासाहेब थोरात म्हणाले. जिल्ह्यात दहशतीचे झाकण अजून थोडे उडवायचे राहिले, अशी मिश्किल टिपणी त्यांनी केली. दरम्यान, आमदार बाळासाहेब थोरात यांच्या यशोधन कार्यालयासमोर काँग्रेस कार्यकर्त्यांनी महाविकास आघाडीच्या विजयाबद्दल नाचून आनंद व्यक्त केला. जिल्ह्यात मविआच्या उमेदवारांचा विजय झाल्याबद्दल आमदार बाळासाहेब थोरात यांच्या यशोधन कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.

# मान्सूनमध्ये महाराष्ट्रात सरासरीच्या ९९ टक्के पाऊस

## हवामान तज्ज्ञ डॉ.साबळे यांचा अंदाज

**नगर : प्रतिनिधी**

**नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांपासून (मॉन्सून) जून ते सप्टेंबर या कालावधीत यंदा राज्यात सरासरीच्या ९९ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज ज्येष्ठ कृषी हवामान तज्ज्ञ डॉ. रामचंद्र साबळे यांनी वर्तविला आहे. या अंदाजात पाच टक्के कमी-अधिक तफावत राहण्याची शक्यता आहे.**



डॉ. साबळे म्हणाले, "महाराष्ट्राच्या दुष्काळी पट्ट्याच्या पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या काही जिल्ह्यांत तेथील सरासरीपेक्षा कमी पाऊस होण्याचे संकेत आहेत. 'मॉन्सूनचे आगमन कोकणात ६ जूनपर्यंत होईल. १५ जूनपर्यंत संपूर्ण महाराष्ट्र व्यापेल. यंदा पावसाच्या वितरणातील फरकाबरोबरच पावसात पडणारे खंड आणि कमी कालावधीमध्ये अधिक पाऊस ही या हंगामातील मुख्य वैशिष्ट्य ठरणार आहेत. बंगालच्या उपसागर आणि अरबी समुद्र या दोन्ही सागरातील शाखा यंदा सक्रिय राहतील," असे डॉ. साबळे यांनी सांगितले.

# कांद्याने घेतली पुन्हा उसळी



**नवी मुंबई :** वाशीतील एपीएमसी बाजारात कांद्याच्या दराने पुन्हा उसळी घेतली असून मागील आठवड्याच्या तुलनेत प्रतिकिलो २ ते ३ रुपयांची दरवाढ झाली आहे. बाजारात सध्या आवक कमी होत आहे, तसेच बहुतांश उत्तम दर्जाचे कांदे साठवणूक करून ठेवल्याने कांद्याच्या दरात वाढ होत आहे, अशी माहिती व्यापाऱ्यांनी दिली आहे. एपीएमसीत प्रतिकिलो २२-२५ रुपयांनी विक्री होणारे कांदे आता २५ ते २९ रुपयांवर गेले आहेत.

गुरुवारी बाजारात ६८ गाड्या दाखल झाल्या असून कांदा २५ ते २९ रुपयांनी विक्री झाला आहे. पुढील कालावधीत देखील कांद्याची दरवाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मे महिन्यामध्ये ठेवणीचे कांदे घेण्यासाठी ग्राहकांची लगबग सुरू असते. गेल्या वर्षी ठेवणीचे कांदे १२ ते १५ रुपयांपर्यंत उपलब्ध होते, मात्र तेच यंदा २० रुपयांवर विक्री झाली आहेत. यंदा कांद्याचे उत्पादन कमी आहे. त्याचबरोबर उत्तम दर्जाचा कांदा साठवणूक करून ठेवला आहे आणि उष्णतेमुळेही कांदे खराब निघत आहेत.

SACCHIDANAND CAREER INSTITUTE
Parner Public School
G.M INTERNATIONAL SCHOOL PARNER
ADMISSIONS OPEN 2024-25
प्रवेश सुरू २०२४-२५
PARNER PUBLIC SCHOOL
LKG, UKG, STD 1st
State Board
11th Science (State Board & NCERT Syllabus)
Integrated with NEET & MHT-CET
MHT-CET (Engg., NATA, Architecture, NDA, Other Entrance)
NEET (Medical, Agri, Pharmacy, Other Entrance)
G. M. INTERNATIONAL SCHOOL
LKG, UKG, STD 1st to 5th
CBSE Board

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
प्रसूती पूर्व तपासणी
संपूर्ण प्रसूती उपचार
अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
वारंवार होणारे गर्भपात,
लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
* आमची वैशिष्ट्ये *
* १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
* एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
* प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
* मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
* अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
* PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
* पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
* ॲडमिशन ओपन *
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# नगरच्या राजकारणामध्ये लंके पॅटर्नचा प्रभाव !

## ■ राजकारणातील समाजकारणाचा विजय ■ उत्तरेकडील यंत्रणा दक्षिणेच्या सपोर्ट सिस्टीम कडून चितपट ■ महाराष्ट्राच्या राजकारणात नीलेश लंके यांचे महत्त्व अधोरेखित

पारनेर : नाना करंजुले

**काना, मात्रा, वेलांटी नसलेले अहमदनगर राजकारणाचे माहेरघर समजले जाते. या ठिकाणी मातब्बर राजकीय घराणे आहेत. मात्र समाजकारणातून पुढे आलेल्या नीलेश लंके यांनी लोकसभा निवडणूक जिंकत उत्तरेकडील यंत्रणेचा अक्षरशा चितपट केले. त्यामुळे त्यांचे जिल्ह्यातच नव्हे तर राज्याच्या राजकारणामध्ये महत्त्व अधोरेखित झाले. सोशल पॉलिटिकल लीडर म्हणून अहिल्यानगर दक्षिणचे निर्वाचित खासदार पुढे आले आहेत.**

अहमदनगर म्हटलं की विखे पाटील हे समीकरण गेल्या अर्ध्या दशकावून अधिक काळ पहावयास मिळते. त्यांच्याबरोबर इतर अनेक राजकीय घराण्यांचा आपापल्या तालुक्यामध्ये त्याचबरोबर परिसरात दबदबा राहिलेला आहे. आजही आपला आपला सुभा जपून ठेवण्यासाठी राजकीय घराणे प्रयत्न करीत आहेत. क्षेत्रफळाने मोठा असणाऱ्या जिल्ह्यात दोन लोकसभा मतदारसंघ आहेत. शिर्डी राखीव असल्याने मागील निवडणुकीत डॉ सुजय विखे यांनी काँग्रेसचा हात सोडत भाजपाचे कमळ हातात घेतले. त्यांच्यापाठोपाठ राधाकृष्ण विखे पाटील यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. दरम्यान नगर दक्षिण मध्ये मागील निवडणूक डॉ सुजय यांनी मोठ्या फरकाने जिंकली. त्यांनी संग्राम जगताप यांचा पराभव केला. मोदी लाटेचा त्यांना मोठा फायदा झाला. या निवडणुकीत नीलेश लंके यांनी विखे यांना आव्हान दिले. येथे काटे की टक्कर पाहावयास मिळाली.

प्रवराची यंत्रणा इलेक्शन मॅनेजमेंट मध्ये अत्यंत प्रसिद्ध आहे. इतक्या मोठ्या शक्तीसमोर लंके तग धरतील का असा प्रश्न राजकीय क्षेत्रातील मातबरांना पडला होता. ते निवडून येतील का अशा प्रकारचे प्रश्न उपस्थित केले जात होते. परंतु गेल्या दोन वर्षांपासून या मतदारसंघांमध्ये तयारी केलेल्या लंके यांना आपल्या विजयाची खात्री होती. कोरोना मध्ये केलेले काम त्यांना लोकप्रियतेच्या शिखरावर घेऊन गेले. होम ग्राउंड असलेल्या पारनेर मधील मतदारांवर त्यांचा प्रचंड विश्वास होता. पारनेरकर सुद्धा त्यांच्या पाठीमागे ठामपणे उभे राहिले. श्रीगोंदा तालुक्यातील मतदारांनी अक्षरशा कमाल केली. कर्जत जामखेड मधील मतदारांनी महाविकास आघाडीला कौल दिला. महाराष्ट्रामध्ये प्रचंड क्रेझ असणारे लंके हे सामाजिक चेहरा म्हणून ओळखले जातात.

राजकारणापेक्षा समाजकारणी म्हणून त्यांची इमेज बिल्ड झालेली आहे. राज्याच्या राजकारणामध्ये प्रचंड ताकतवान असणाऱ्या विखे कुटुंबीयांचा पराभव करणे मोठी आव्हानात्मक गोष्ट होती. मात्र ती किमया नीलेश लंके यांनी साधली आणि त्यांनी विखे आणि भाजपाचा मजबूत गडाला सुरुंग लावला. पंतप्रधान, मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्यांनी त्यांच्यासाठी सभा घेतल्या मात्र त्यांच्या प्रचार डॉ सुजय विखे यांना विजयापर्यंत घेऊन गेला नाही.

### राजकीय परिपक्कता सिद्ध!

**सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलेल्या नीलेश लंके यांना सामाजिक पार्श्वभूमी आहे. हे नाणे राजकारणात सुद्धा चालल्याचे दिसून आले. लंके यांनी केलेला प्रचार त्याचबरोबर निवडणुकीच्या काळामध्ये ठेवलेला संयम यातून त्यांच्यातील राजकीय परिपक्कता सिद्ध झाल्याचे दिसून आले.**



### पारनेरच्या मताधिक्याचा दावा फोल!

पारनेर विधानसभा मतदारसंघांमध्ये डॉ सुजय विखे पाटील हे आघाडीवर राहतील. नीलेश लंके होम ग्राउंड वरच मागे पडतील अशा प्रकारचा अपप्रचार संपूर्ण लोकसभा मतदारसंघांमध्ये करण्यात आला होता. महाविकास आघाडीचा कार्यकर्त्यांचे मनोबल खचावे यासाठी हा डावपेच आखण्यात आल्याचं दिसून आले. परंतु पारनेर मध्ये ३८ हजार इतके मताधिक्य लंके यांना मिळाले.

### पारनेर आई तर श्रीगोंदा मावशीच्या भूमिकेत!

खासदार नीलेश लंके यांना त्यांच्या जन्मभूमी असलेल्या पारनेर तालुक्याने तारले. त्या खालोखाल श्रीगोंदा तालुक्याने मताधिक्य देत नवनियुक्त खासदारांना पाठबळ दिले. त्यामुळे पारनेर आई उत्तर श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघ मावशीच्या रूपामध्ये पुढे आल्याचे दिसून आले. त्यामुळे विजयी सभा पारनेर आणि श्रीगोंदा तालुक्याच्या सीमेवर घेण्यात यावी अशी मागणी कार्यकर्त्यांकडून करण्यात आली आहे.

### पवारांची पावर; थोरातांची ताकद!

बाळासाहेब थोरात आणि राधाकृष्ण विखे पाटील यांचे राजकीय वैमानस्य अनेक वर्षांपासून आहे. परस्परांना शह काटसह देण्यासाठी दोघे एकही संधी सोडत नाहीत. विखे यांना पराभूत करण्यासाठी बाळासाहेब थोरात आणि नगर दक्षिण मध्ये निलेश लंके यांना ताकद दिली. पवारांची पावर तर होतीच त्याचबरोबर थोरात यांचा अनुभव सुद्धा लंके यांच्या कामी आला.

# खासदार नीलेश लंके यांच्या विजयाचा सर्वत्र जल्लोष

## फटाक्यांची आतिषबाजी अन् गुलालाची उधळण



निघोज : प्रतिनिधी

**खासदार नीलेश लंके यांच्या विजयाचा पारनेर तालुक्यात सर्वत्र मोठ्या प्रमाणात जल्लोष होत असून गावोगावी दुपारी एक वाजेपासून फटाक्यांची आतषबाजी करीत तसेच गुलालाची उधळण करीत जल्लोष साजरा करण्यात आला.**

आमदार नीलेश लंके खासदार होणार म्हणून निवडणूकीनंतर बहुसंख्य तालुक्यातील उत्साही कार्यकर्त्यांनी अगोदर खासदार लंके यांचे अभिनंदनाचे होर्डिंग्ज लावले होते.मंगळवारी लंके यांच्या निघोज येथील उत्साही कार्यकर्त्यांनी सकाळी साडेसात वाजता एस टी बस स्थानक परिसरात फटाक्यांची आतषबाजी करीत गुलाल आमचाच अशा घोषणादेत आनंद व्यक्त केला. गेली साडे चार वर्षांपूर्वी आमदार लंके यांनी शिवसेनेतून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करीत विधानसभा निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत त्यांनी शिवसेनेचे उमेदवार विधानसभेचे माजी उपसभापती विजय औटी यांचा ६१ हजार मतांनी पराभव केला होता. आजपर्यंत विधानसभा निवडणुकीत एवढा मोठा विजय पारनेर - नगर मतदासंघात कुणाचाच न झाल्याने लंके हे जनतेच्या गळ्यातील ताईत बनले होते.

कोरोना काळात त्यांनी कोरोंना सेंटर माध्यमातून तब्बल पन्नास हजार पेक्षा जास्त रुग्णांची देखभाल करीत मोठया प्रमाणात पाठबळ दिले होते. विशेष म्हणजे जिल्ह्यातील कोरोना रुग्ण मोठ्या प्रमाणात त्यांच्याकडे आले होते. यावेळी त्यांचा नावलौकिक राज्यात झाला होता. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी लंके यांच्या वाढदिवशी दोन वेळा एकदा सुपा व निघोज येथे उपस्थित राहून लंके यांच्या कार्याचे कौतुक केले होते. तसेच हंगा येथे पवार यांनी लंके यांच्या पत्र्याच्या घराला भेट देऊन दोन तास पाहुणचार घेतला होता. मात्र अजित पवार भाजप सरकारमध्ये उपमुख्यमंत्री झाल्यानंतर लंके यांनी अजितदादा यांच्या पक्षात जाण्या अगोदर आमदारकीचा राजीनामा दिला होता. त्यावेळी जिल्हाभरात त्यांचे मोठ्या प्रमाणात स्वागत झाले होते. लोकसभा निवडणुकीतील उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी लंके यांनी दक्षिण लोकसभा मतदारसंघात जनसंवाद यात्रा सुरू केली होती. या जनसंवाद यात्रेला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला होता. प्रत्यक्षात लोकसभा निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर लंके यांच्या बरोबर जाणे पसंत केले. आमदार लंके यांनी साडेचार वर्षात मतदारसंघात सतराशे कोटींची विकासकामे करुण एक विक्रम केला आहे.

निघोज आणि परिसरातील सर्वाधिक ७१ कोटीची विकासकामे केली आहेत. मात्र लोकसभा निवडणुकीत आपण इच्छुक असल्याचे त्यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना सांगितले होते मात्र खासदार डॉ सुजय विखे पाटील यांना भाजपने अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात उमेदवारी जाहीर केल्याने त्यांनी शरद पवार यांच्या पक्षात जाणे पसंत केले . राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी लोकसभा निवडणूक जाहिर झाल्यानंतर लंके हेच आमचे उमेदवार असेही जाहीर केले होते. लंके यांनी पवार प्रचारार्थ शरद पवार यांनी पारनेर सोडून प्रत्येक विधानसभा मतदारसंघात सभा घेतल्या होत्या.

खासदार विखे पाटील यांनी सुद्धा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सहीत मोठ मोठ्या नेत्यांच्या सभा घेऊन झंजावती प्रचार केला होता. लंके यांच्या प्रचारार्थ युवकांनी निधी गोळा करीत तसेच सर्वसामान्य जनतेने स्वखर्चाने लंके यांचा प्रचार करीत पाथर्डी, शेवगाव,राहुरी,नगर, श्रीगोंदा, कर्जत जामखेड या तालुक्यांत प्रचाराचे नियोजन केले होते. लंके यांच्या विजयाने सर्वसामान्य माणूस खासदार झाल्याची भावना प्रत्तेकाने व्यक्त केली असून सर्व मतदारसंघात मिरवणूक,डी जे व ढोल ताशा या वाद्याने वातावरण निर्माण झाले असून गुलालाची उधळण करीत तसेच मिठाई एकमेकांना भरवीत विजयाचा जल्लोष झाला.

**सर्वसामान्य शिक्षकाचा मुलगा ते शिवसैनिक तसेच आमदार ते खासदार हा माजी आमदार नीलेश लंके यांचा राजकीय प्रवास सर्वांना थक्क करणारा असून याच मतदारसंघात यशवंतराव गडाख यांनी केलेला खासदार डॉ सुजय विखे पाटील यांचे आजोबा माजी खासदार बाळासाहेब विखे यांचा पराभव तसेच माजी मंत्री शंकरराव काळे यांचा लोकसभा निवडणुकीत केलेला सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणून बडदे यांनी केलेला पराभव आजही सर्वांच्या आठवणीत असून लंके यांनी केलेला डॉ. सुजय विखे यांचा पराभव हा कमी मताधिक्याने झाला असला तरी प्रवरा यंत्रणेचा विचार केला तर तसेच प्रभावी विखे फॅक्टर ही यंत्रणा राज्यात प्रसिद्ध असून या यंत्रणेचा दबदबा राज्यात असून लंके यांचा विजय हा राज्यात सर्वाधिक मोठा असून लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून पारनेरच्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला खासदार होण्याची संधी मिळाली हे भाग्य लंके यांनी तालुक्याला मिळवून दिले हा विजय हा पारनेरलाच काय परंतु नगर जिल्ह्यातील जनतेला अभिमानास्पद असल्याची प्रतिक्रिया सर्वत्र व्यक्त होत आहे.**

**गेली दोन दिवसांपूर्वी मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट निवडणूकीत लंके यांच्या कार्यकर्त्यांनी मताधिक्याने २० जागा जिंकत सत्ता ताब्यात घेतली त्यावेळी विजयी सभेत आज गुलाल आमचा व मंगळवारचा गुलालही आमचाच ही घोषना दिली होती. लंके हे खासदार होणार हा सर्वाधिक विश्वास निघोजकरांना सर्वाधिक होता. लंके हे हंगा गावचे असले तरी निघोज येथे लंके यांची भावकी मोठ्या संख्येने असल्याने लंके हे निघोजचे आहेत अशी लंके भावकी अभिमानाने पहिल्यापासून म्हणत आहे. एकप्रकारे मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट निवडणुकीत लंके यांच्या विजयाचा संकेत मिळाला होता. खासदार लंके यांची मळगंगा देवीवर अपार श्रद्धा आहे. म्हणून निघोजकरांनी दुपारी एक वाजेपासून फटाक्यांची आतषबाजी करीत सवाद्य मिरवणूक काढीत जोरदार जल्लोष केला आहे.**

# निघोज-अळकुटी जि.प.गटात खासदार लंकेंना यांना सव्वा दहा हजार मतांची आघाडी

## ■ डॉ. सुजय विखे पाटील यांना अवघी ९ हजार ९५४ मते ■ खा.लंके यांना २० हजार २५१ मते देऊन मतदारांनी दिली मोठी साथ

निघोज : प्रतिनिधी



**निघोज - अळकुटी जिल्हा परिषद गटात खासदार नीलेश लंके यांना सव्वा दहा हजार मतांची आघाडी मिळाली असून विखे पाटील यांच्या गटाचा जिल्हा परिषद सदस्य असूनही डॉ.सुजय विखे पाटील यांना अवघी ९ हजार ९५४ मते मिळाली आहेत.खासदार नीलेश लंके यांना २० हजार २५१ मते देऊन मतदारांनी दिली मोठी साथ केली असून हा जिल्हा परिषद गट राष्ट्रवादी काँग्रेसचा अभेद्य बालेकिल्ला असल्याचे या निवडणुकीत पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.**

गेली कित्येक वर्षांपासून निघोज - अळकुटी जिल्हा परिषद गट हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून अभेद्य असला तरी मध्यंतरीच्या काळात कधी शिवसेना तर कधी विखे पाटील यांच्या गटातील जिल्हा परिषद सदस्य झाले असले तरी राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर गेली अनेक वेळा जिल्हा परिषद गट असो की पंचायत समिती गण असो राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार सातत्याने या ठिकाणी निवडून येत होते. राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना शरद पवार यांनी केल्यानंतर प्रामुख्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व निघोज ग्रामीण संस्था परिवाराचे संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब कवाद यांनी सर्वप्रथम निघोज येथे कार्यकर्ता मेळावा घेऊन आम्ही राष्ट्रवादी म्हणून सर्वप्रथम जाहिर केले त्यानंतर तालुक्यातील बहुतांश गावात या मेळाव्याचे पडसाद उमटले आणि राष्ट्रवादी काँग्रेसला खऱ्या अर्थाने पाठबळ देण्याचे काम या तालुक्यात झाले आहे.

गेली तीस ते पस्तीस वर्षाच्या कार्यकाळात निघोज - अळकुटी जिल्हा परिषद गट व निघोज व अळकुटी पंचायत समिती गणाने खऱ्या अर्थाने राष्ट्रवादी काँग्रेसला मोठ्या प्रमाणात साथ दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला या गटामध्ये प्रबळ करण्यासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य बाबासाहेब कवाद, माजी उपसभापती नानाभाऊ वरखडे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती मधुकर उचाळे, अळकुटी गावचे माजी सरपंच बाबाजी भंडारी, माजी सभापती व ज्येष्ठ नेते कुंदनकाका साखला अशा अनेक दिग्गज नेत्यांचा मोठा सहभाग आहे. राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाल्यानंतर या जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादी कार्यकर्त्यांना जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य होण्याची संधी मिळाली. नानाभाऊ वरखडे यांना उपसभापती होण्याची संधी मिळाली तसेच मधुकर उचाळे हे जिल्हा परिषदेचे सभापती झाले. मात्र गेली दहा ते बारा वर्षात शिवसेना व विखे पाटील यांनी मात्र या गटावर प्रभुत्व मिळवून राष्ट्रवादी काँग्रेसला मोठ्या प्रमाणात शह दिला. मात्र गेली साडेचार वर्षांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत मात्र आमदार नीलेश लंके यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संघटन मोठ्या प्रमाणात करीत या निघोज - अळकुटी जिल्हा परिषद गटावर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले.

विखे पाटील गटाच्या जिल्हा परिषद सदस्या असूनही विधानसभा निवडणुकीत लंके यांनी या गटात विक्रमी मताधिक्य मिळवीत पुन्हा एकदा हा गट राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात घेतला. लोकसभा निवडणूकीत सुद्धा याची प्रचिती मोठ्या प्रमाणात आली असून ज्येष्ठ मंडळी व युवा कार्यकर्ते यांनी एकमेकांशी समन्वय साधीत लंके यांना भरभक्कम अशी सव्वा दहा हजार मतांची आघाडी मिळवून देत विखे पाटील गटाला जोरदार टक्कर देत हा जिल्हा परिषद गट हा आमचाच हेच सिद्ध केले आहे. प्रमुख व मोठ्या मतांची गावे म्हणून प्रसिद्ध असलेल्या निघोज गावात लंके यांना अडीच हजार पेक्षा जास्त मताधिक्य मिळाले. अळकुटी गावांमध्ये ८०० पेक्षा जास्त मताधिक्य मिळाले. राळेगण थेरपाळमध्ये मात्र लोकनियुक्त सरपंच पंकज कारखीले यांनी लंके यांना रोखण्यासाठी यशस्वी झाले असून विखे पाटील यांना ११८५ तसेच लंके यांना ११३८ मतदान झाले आहे.

**निघोज जिल्हा परिषद गटातील गाववार मतदान**

**निघोज लंके -४९४९,विखे पा.२३४९ ,वडनेर लंके -१३६७, विखे पा. ४३५, कोहोकडी लंके ९०९,विखे पा. ६२८ राळेगण थेरपाळ -लंके ११३८,विखे पा. ११८५,गुणोरे - लंके ६७४,विखे पाटील ५४६, गाडीलगाव -लंके ३१८, विखे पा. १५९ , म्हसे -लंके ५३२ विखे पा. २६६ , रांधे -लंके १०३५,विखे पा. २७० , शेरी -लंके ,विखे पा. ७५, अळकुटी- लंके १६३२, विखे पा. ८१६ ,पाडळी आळे लंके ७२९ ,विखे पा. ४५५ ,**
**कळस -लंके ८१०,विखे पा. ४०५,गारखिंडी -लंके ४६०विखे पा.१५९**

दरोडी - लंके ४३५ विखे पा. ३१२,लोणी मावळा - लंके १०९२,विखे पा. ५६५, पाबळ लंके ३२९,विखे पाटील २१२ म्हस्केवाडी -लंके ९०७ विखे पा. २३३,रेनवडी -लंके ६२७ विखे पा. २७१ , चोंभूत -लंके ७७७विखे पा. ३१६,शिरापूर -लंके १२७५,विखे पा. २९७ खासदार नीलेश लंके एकूण -२०२५१ माजी खासदार विखे पाटील एकूण ९९५४ एकूण आघाडी १०२९७

अशाप्रकारे खासदार नीलेश लंके यांना निघोज - अळकुटी जिल्हा परिषद गटात सव्वा दहा हजार मतांपेक्षा जास्त आघाडी मिळाली असून राष्ट्रवादी काँग्रेसने या जिल्हा परिषद गटांवर निर्विवाद वर्चस्व मिळविले आहे.

**राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाल्यानंतर १९९९ लोकसभा निवडणुकीत जी एस महानगर बँकेचे संस्थापक अध्यक्ष सॉलिसिटर गुलाबराव शेळके साहेब व माजी खासदार बाळासाहेब विखे पाटील यांची लढत झाली होती विशेष म्हणजे पारनेर विधानसभा मतदारसंघ त्यावेळी कोपरगाव म्हणजे उत्तर मतदारसंघात होता. कोपरगाव, श्रीरामपूर, राहुरी, शिर्डी, संगमनेर असे सहकार चळवळीतील साखर सम्राटांचे तालुके या उत्तर लोकसभा मतदार संघात असताना सुद्धा शेळके साहेब यांनी विखे पाटील यांना कडवी लढत देऊन अगदी थोड्या मतांनी पराभूत झाले. शेळके साहेब यांची खासदार होण्याची संधी थोडक्यात हुकली मात्र आत्ता मात्र पारनेरला खासकारकी मिळणार नाही याची खात्री जनतेला होती असे असताना २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत माजी आमदार नीलेश लंके यांनी गेली दिड वर्ष लोकसभा निवडणुकीची तयारी करुन खासदारकी मिळवल्याने खऱ्या अर्थाने सॉलिसिटर गुलाबराव शेळके व जनतेचे स्वप्न पुर्ण करुण एक दुष्काळी तालुक्यातील युवा नेतृत्व काय करु शकतो हे साखर सम्राटांची सत्ता असलेल्या पुढाऱ्यांना दाखवून दिले असून राज्यात फक्त आणी फक्त नीलेश लंके यांचाच बोलबाला आहे.**

**ग्रामिण विकास शिक्षण मंडळ**
मु.पो.टाकळी हाजी, ता.शिरुर, जि.पुणे - ४१२२१८

**शिक्षक पाहिजेत**

संस्था संचालीत विद्याल्यात खालीलप्रमाणे शिक्षक कर्मचारी पाहीजेत. त्यांस संस्थेमार्फत योग्य ते ठोक मानधन दिले जाईल.

| अ. न. | पदाचे नाव | पदसंख्या | विषय | शैक्षणिक. पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | उपशिक्षक | ३ | गणित/विज्ञान | बी.एस्सी. बीएड |
| २ | उपशिक्षक | १ | हिंदी | बी.ए.बीएड |
| ३ | उपशिक्षक | १ | इंग्रजी अर्धवेळ ज्युनि.व्याख्याते | बी.ए.बीएड |
| ४ | उपशिक्षक | १ | बायोलॉजी/बॉटनी/कॉप सायंन्स | बी.एस्सी. बीएड/एम एस्सी ॲग्री |

इच्छुक उमेदवारांनी अर्ज व मुळ प्रमाणपत्रांसह वार गुरूवार दि.१३/६/२०२४ रोजी स. ११.00 वाजता स्वखर्चाने मुलाखतीस संस्थेच्या मा. बापुसाहेब गावडे माध्यामिकविद्यालय टाकळी हाजी ता.शिरुर जि.पुणे येथील विद्याल्यात उपस्थित रहावे.

**मा.सचिव,**
ग्रामिण विकास शिक्षण मंडळ,
टाकळी हाजी, ता.शिरुर, जि.पुणे

**'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com**
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com